वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

## त्या धडाकेबाज मुस्लिम नेत्यांचे बारा वाजविणाऱ्या युवराज ची घड्याळ आता थांबणार

## नगर परिषदेचा उमेदवारी फॉर्म निट भरता येत नाही आणि युवराज म्हणतो मला आमदार करा

## अनेक मुस्लिम नेत्यांची लावली कुपाटी, तेच लावतील आता युवराज ची वाट

# येडं उठलं अन् झाडाला खेटलं

## समाज बांधवांनो, पैगंबरांच्या विरूध्द बोलणाऱ्या, मदत करणाऱ्या,महायुतीच्या उमेदवारांकडे मुस्लिम पुढारी कार्यकर्ते

लाख-पाच लाखात आपला इमान गहान ठेवत आहेत आपण यांच्या सांगण्यावरून महायुतीच्या उमेदवाराला मतदान कणार का?

दिव्य वार्ता


## महायुतीला मत म्हणजे पैगंबराच्या विरूध्द बोलणाऱ्याला मत

## महायुतीला मत देवून आपले इमान गहान ठेवू नका












## मुस्लिम मतदारांना जिहादी मतदार म्हणाऱ्यांना आपण मतदान करणार का?

### मुस्लिमांना आम्ही कदापी आरक्षण देणार नाही, असे अमित शहा म्हणारे महायुतीच्या उमेदवाराला आपण मतदान करणार का?

### औरंगाबादमधून औरंगजेब (रह)ची मजार उखडून फेकून देण्यात येईल असे फडणवीस म्हणतात अशा महायुतीला आपण मतदान करणार का?

### खुनशी राजकारणामुळे मुस्लिम लिडरशिपचे वाटोळे करणाऱ्या या युवराजला आपण मतदान करणार का?

### मतदारांनो विश्वास ठेवू नका यांच्या हाती नगर परिषदेची ३५ वर्षे एक हाती सत्ता होती विकासाच्या नावाने शहराचे वाटोळे करणाऱ्यांना आपण मतदान करणार का?


आजच्या परिस्थितीवरून महायुतीचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर?

सहाही मतदान संघात महायुतीच्या उमेदवारांवर मुस्लिम समाजाची प्रचंड नाराजी

मुस्लिम मतदारांनो महायुतीच्या उमेदवारांना मतदान करून पापाचे भागीदार होवू नका?

महायुतीची सत्ता आल्यास मस्जिदीवरील सर्व भोंगे काढण्यात येतील असे नितीश राणे म्हणतात या महायुतीच्या उमेदवाराला आपण मतदान करणार का?

जालन्यातील महायुतीचा एक पुढारी मुस्लिम कार्यकर्त्याला फोटोमध्ये येवून नये म्हणून लाथ मारून बाजुला करणाऱ्या महायुतीला आपण मतदान करणार का?









## स्वाभिमानी,निष्ठावंत आ.संदीप क्षीरसागर यांना

# प्रचंड मताधिक्याने विजयी करा

### खासदार बजरंग सोनवणे ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे यांचे मतदारांना आवाहन



बीड (दिव्य न्युज):- आ. संदीप भैय्या म्हणजे बीड मतदार संघातील जनतेचा खरा निष्ठावंत आणि विकासाभिमुख लोकप्रतिनिधी आहे. पक्ष अडचणीत असतानाही संदीप भैय्या यांनी पवार साहेबांची साथ सोडली नाही. अशा स्वाभिमानी लोकप्रतिनिधीला पुन्हा एकदा बीड मतदार संघातून आमदार म्हणून निवडून द्या असे आवाहन जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे व पक्षाचे ज्येष्ठ नेते जीवनराव गोरे यांनी केले.तर या विधानसभा निवडणुकीत आपण सर्व सहकारी एकत्र आलो आहोत. आपली ही एकजूटच आपल्याला विजयाकडे घेऊन जाणार आहे असा विश्वास आमदार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.राष्ट्रवादी परिवारातील सहकारी, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मंगळवारी (दि.१२) शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार संदीप क्षीरसागर यांच्या ▶▶ पान २ वर



# गुडबाय न्यायमूर्ती धनंजय यशवंत चंद्रचूड

## ब्राम्हणी कॉलेजियम सिस्टीम चे नासक प्रोडक्ट

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):- भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड, जे ८ नोव्हेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत, त्यांनी दोन वर्षांपूर्वी अत्यंत उच्च नैतिक आधाराने भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.त्याच्याकडून खूप अपेक्षा होत्या पण न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड दोन वर्षांच्या कार्यकाळात मोदी सरकारच्या पाठीशी कायम उभे राहताना दिसले व नरेंद्र मोदींचा पाहुणचार आणि स्वागत करताना.

आपल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनी न्यायदेवतेच्या डोळ्यांवरील पट्टी काढून टाकली आणि संदेश दिला की आता कायदा आणि न्यायालये त्यांच्यासमोर येणाऱ्या लोकांना ओळखू शकतात आणि त्याच आधारावर निकाल देतील.चार निर्णय न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांचे. १- इलेक्टोरल बॉण्ड- त्यांचा इलेक्टोरल बाँडमधील निर्णय धाडसी होता, त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाला सर्व माहिती सार्वजनिक करण्यास भाग पाडले, स्टेट बँक ऑफ इंडियानेही ते सार्वजनिक केले आणि जगाने पाहिले की देणग्या घेऊन कसे करार केले जातात, देणगी घेऊन जामीन मंजूर झाला, देणगी घेऊन आरोपीला साक्षीदार बनवले.

हा स्पष्टपणे भ्रष्टाचार होता, सर्वोच्च न्यायालयाने हे असंवैधानिक, बेकायदेशीर असल्याचे सांगितले आणि हे सर्व स्पष्ट असतानाही न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनी काहीही केले नाही, आणि भ्रष्टाचाराचा सर्व पैसा ज्याच्याकडे होता त्याच्याकडेच राहिला आणि प्रकरण शांत झाले आणि पैसे जप्त केले नाहीत किंवा कोणाला शिक्षा झाली नाही.

२- महाराष्ट्र सरकार:- न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनी महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे सरकार पाडून स्थापन केलेल्या शिंदे सरकारला बेकायदेशीर म्हटले, परंतु सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला बेकायदेशीर घोषित करूनही सरकार चालूच राहिले, न्यायमूर्ती डी. वाय चंद्रचूड यांनी कोणताही निर्णय न देता शिंदेंच्या बेकायदेशीर सरकारने आपला कार्यकाळ पूर्ण केला. म्हणजे त्यांच्या कोर्टात चोर पकडला गेला, तो चोरी करताना पकडला गेला, त्याने चोरीचा निकालही दिला आणि मग चोराला चोरीचा माल दिल्यानंतर तो निर्दोष सुटला.

३- चंदीगड महापौर निवडणूक:- न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनी या प्रकरणात पीठासीन अधिकारी अनिल मसिह यांची चोरी पकडली, अनिल मसिह यांना लोकशाहीचा खूनी म्हटले, निर्णय फिरवला पण चोरी करणाऱ्याला वाचवले. लोकशाहीचा मारेकरी अनिल मसिह माफी मागून बचावला.

४- बाबरी मशीद:- हा निर्णय



चोराला चोरीचा माल देण्याचा एक स्पष्ट खटला होता, ज्यामध्ये न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड आणि इतर चार न्यायाधीशांच्या खंडपीठाने निर्णय दिला की, मुघल सम्राट बाबरने कोणतेही राम मंदिर पाडले नाही, बाबरी मशीद ही नाही. राम मंदिर पाडले नाही, बाबरी मशिदीच्या खाली राम मंदिराची रचना नाही, ६ डिसेंबर १९९२ ला बाबरी मशिदीला शहीद करणे ही गुन्हेगारी घटना होती, बाबरी मशिदीत मूर्ती ठेवणे ही गुन्हेगारी घटना होती.

इतके गुन्हे स्वीकारल्यानंतरही खंडपीठाने गुन्हेगारांना शिक्षा देण्याऐवजी त्या गुन्ह्यासाठी ज्या पक्षावर खटला चालवला जात होता, त्या पक्षाला बाबरी मशिदीची जमीन दिली. तेथे मंदिर बांधण्यात आले आणि न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांनीही तेथे भेट दिली. देशात न्यायाचे हे मॉडेल दिल्यानंतर आता न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड जी सांगत आहेत की, त्यांनी हा निर्णय दैवी आदेशानंतर दिला होता. माफ करा न्यायाधीश साहेब, आमचा देव असा निर्णय देऊ शकत नाही, हे तुमच्या निवृत्तीनंतर होईल. याशिवाय नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याशी संबंधित सर्व खटल्यांमध्ये त्यांना पाठीचा कणा सरळ ठेवता आला नाही आणि त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती लोया प्रकरण मिळवून अमित शहा यांना क्लीन चिट दिली.

त्याचप्रमाणे अदानीच्या प्रत्येक केसला दडपून ठेवल्याबद्दल आणि उमर खालिद, शर्जील इमाम, खालिद सैफी, गुलफिशा यांना गेली ५ वर्षे सुनावणी न घेता सतत तुरुंगात ठेवल्याबद्दल त्यांनी मौन बाळगल्याबद्दलही ते लक्षात राहतील. उपासना कायदा-१९९१ असूनही ज्ञानविपा मशिदीच्या सर्वेक्षणाला परवानगी दिल्याबद्दल आणि ईव्हीएमच्या मुद्द्यावर पांघरूण घालण्यासाठी ते लक्षात राहतील. भीमा कोरेगाव प्रकरणातील आरोपींना तुरुंगात राहू देणे,नरेंद्र मोदी सरकारच्या अजेंड्याशी संबंधित निर्णय न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांना कसे दिले गेले, या रोस्टरचे मास्टर म्हणून ते लक्षात राहतील. जस्टिस बेला त्रिवेदी हे नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असताना त्यांच्या कायदा सचिव होत्या आणि त्यांनी त्यांच्या हाताखाली काम केले होते.एक चांगली गोष्ट म्हणजे माजी सरन्यायाधीश अरविंद बोबडे यांच्याप्रमाणे त्यांनी सार्वजनिक ठिकाणी आपली पँट गमावली नाही.

### मी काय पाप केलं, माझं आणि भावाचं घर जाळण्यात आलं

## आंदोलन करण्याची ही कसली रीत अन् संस्कृती

### जर मी तक्रार केली असेल तर मला फाशी द्या ;सोळंकेंचे भावनिक वक्तव्य

बीड, (दिव्य न्युज):- राज्यातील लक्षवेधी लढती आणि जिल्ह्यांपैकी एक असलेल्या बीड जिल्ह्यातील निवडणुकांकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यातील ६ विधानसभा मतदारसंघात अनेक ठिकाणी पारंपरिक लढती होत असून परळी आणि माजलगाव मतदारसंघाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. मराठा आरक्षण आणि उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांचा शब्दा जिल्ह्यात प्रमाण मानला जात आहे, त्यामुळे येथील मतदारसंघात कोणता उमेदवार निवडून येणार, कोणता उमेदवार पडणारे याची चर्चा जिल्ह्यात आहे. कारण, परळी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे मैदानात आहेत. तर, माजलगाव मतदारसंघात राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळंके हे स्वत: निवडणूक लढवत आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणूक प्रचाराच्या मुद्द्यांमध्ये त्यांनी आरक्षण चळवळीच्या लढ्यावेळी आपलं घर जाळण्यात आल्याची आठवण सांगितली. तसेच, मी कोणाच्याही नावाने तक्रार केली नाही, असेही ते म्हणाले.

मी असं काय पाप केलं होतं.. माझं आणि माझ्या भावाचे घर जाळण्यात आले. आंदोलन करण्याची ही पद्धत होती काय? घर सोडून आम्हाला पळून जावं लागलं. दोन दोन अडीच वर्षाच्या नातवांना अक्षरशः बंगल्यावरून खाली झेलावं लागले. आंदोलन करण्याची ही कसली रीत आणि संस्कृती आहे, असा सवाल प्रकाश सोळंके यांनी उपस्थित केला आहे. तसेच, मी कोण्याही आंदोलनकर्त्यांच्या नावाची तक्रार दिली नाही. मी कोणालाही अटक करण्यास लावले नाही. इतर कार्यालये जाळण्यात आली त्याच अनुषंगाने पोलिसांनी कारवाई केली होती. तक्रार केली म्हणून मला बदनाम करण्यात आले. जर, मी तक्रार केली असेल तर मला भर चौकात फाशी द्या, असे भावनिक वक्तव्य महायुतीचे माजलगाव मतदारसंघाचे उमेदवार प्रकाश सोळंके यांनी केले आहे. त्यामुळे, येथील निवडणुकीत पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान, माजलगाव मतदारसंघात राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी हा सामना पाहायला मिळत आहे. तर, रमेश आडसकर हे अपक्ष उमेदवारही मैदानात आहेत.

माजलगावचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी राजकीय संन्यास घेत असल्याची घोषणा केली होती. मात्र, अजित पवारांकडून त्यांनाच उमेदवारीचा आग्रह करण्यात आला. त्यामुळे, राष्ट्रवादी महायुतीकडून माजलगाव मतदारसंघासाठी प्रकाश सोळंके यांचे नाव जाहीर करण्यात आले. त्यानंतर, प्रकाश सोळंके यांचे पुतणे नाराजी झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. कारण, सोळंके यांनी त्यांच्या पुतण्याला आपला राजकीय वारसदार म्हणून घोषित केले होते. येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांच्या पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून मोहन जगताप निवडणूक लढवत आहेत. तर, गतवेळेसचे विरोधक असलेले रमेश आडसकर हे अपक्ष मैदानात उतरले आहेत.

## बालाघाट ते वाडी,वस्ती, तांडा प्रचारात कुंडलिक खांडेचा झेंडा

बीड, (दिव्य न्युज):-राजकीय दृष्ट्या अतिसंवेदशिल समजल्या जाणार्या बीड विधानसभा मतदारसंघात प्रचार मध्यान टप्प्यात पोहंचला आहे. रोज वेग वेगळ्या राजकीय घडामोडी घडत असल्याने दोन प्रमुख उमेदवारांना अपक्ष उमेदवारांचे आवाहन वाढत चालले आहे. तिसर्या आघाडीच उमेदवार कुंडलिक खांडे यांनी बीड शहरा पाठोपाठा आता वाडी, वस्ती, तांड्यासह बालाघाटावर आपले बस्तान बसविल्याचे निदर्शनास येत असून क्षीरसागर मुक्तीसाठी आता मतदारच एकत्रित येत खांडेंचे वजन वाढवत असल्याचे दिसून येवू लागले आहे.



बीड मतदारसंघामध्ये महायुती आणि महाविकास आघाडीकडून क्षीरसागर बंधू एकमेकांविरोधात उभे आहेत. अशा स्थितीत अपक्षही आता केवळ क्षीरसागर मुक्तीच्या नार्यावर प्रचारात आघाडी घेवून आहेत. तिसर्या आघाडीचे उमेदवार कुंडलिक खांडे यांनी बीड शहरासह वाडी, वस्ती, तांड्यावर प्रचार शिगेला नेत मतदारांच्या दारात जावून प्रस्थापितांविरोधात माझ्या सारख्या सर्व सामान्य शेतकर्याच्या पोराला विधानसभेत पाठवा असे आवाहन करत आहेत. त्यांच्या आवाहनाला ठिक ठिकाणी मोठा प्रतिसाद मिळत आहे. काल बालाघाटावर कुंडलिक खांडे यांनी बैठक बोलविली मात्र त्या बैठकीचे स्वरूप जाहिर सभेत झाल्याने बालाघाटावरचा मतदार पर्याय शोधत असल्याचे दिसून आले. तो पर्यात कुंडलिक खांडे हाच असल्याचे उपस्थित मतदारांनी चर्चेतून सांगून टाकले. मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत सातत्याने काम करत राहिलेला हा उमदा तरूण समाजाच्या नेतृत्वाचा चेहरा होवू शकतो असे स्पष्टपणे मतदारातूनच बोलावून दाखविले जात आहे. एकीकडे जरांगे पाटील यांनी अपक्षांना मतदान करू नका असे जाहिर आवाहन केले आहे. मात्र कुंडलिक खांडे हे तिसर्या आघाडीचे उमेदवार असून ते मराठा आंदोलनात सक्रीय आहेत. जरांगे पाटलांचा आदेश अपक्षांसाठी आहे मग पर्याय आपल्याला कुंडलिक खांडे हाच असल्याचे मराठा समाजात बोलून दाखविण्यात येत आहे. दुसरीकडे मुस्लिम समाजाला महायुतीला अथवा त्यांच्या उमेदवाराला मतदान करायचे नाही अशा वेळी पर्याय म्हणून अपक्ष कुंडलिक खांडेकडे पाहितलं जात असल्याचे सांगण्यात येते. म्हणुनच सध्या बालाघाट ते वाडी, वस्ती, तांडा कुंडलिक खांडेंचा झेंडा ही घोषणा जोर धरतांना दिसत आहे.

### आज दोन क्षीरसागर एक झाले,मतदानाच्या दिवशी तिघे एक होणार

## जनतेने क्षीरसागर मुक्त बीड करण्याचा निर्धार

बीड (दिव्य न्युज):- गेली चाळीस वर्षांपासून सत्तेत असलेल्या क्षीरसागरांची सत्ता उलथून टाकण्याचा माणसं जनतेने केलेला आहे. गेली पाच सहा वर्षा पासून खोटी भडण खेळून सत्ता हडप करनारे क्षीरसागर जनता स्वीकारणार नाही हे लक्षात आल्यावर नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, आमदारकी निवडणुकीत जनतेला उल्लू बनवून स्वतःच्या कुटुंबाची पोळी भाजून घेण्याच काम क्षीरसागर करत आहेत. २०१९ साली जनतेला उल्लू बनवित निवडणुकीत दोन्ही पक्षांची तिकीट दोन्ही क्षीरसागर यांनी घेऊन जनतेला पर्याय नव्हता एक क्षीरसागर निवडून आला. लोकसभेत जनतेचा काल पाहून क्षीरसागर यांनी पुन्हा तोच डाव सुरू केला एक क्षीरसागर महाविकस आघाडी तिकीट घेऊन आला तर दुसरा क्षीरसागर महा युती कडून तिसरा क्षीरसागर आपक्ष यांना वाटलं इतर उमेदवार अपक्ष राहणार नाही पण विनायकराव मेटे साहेब यांच्या धर्म पत्नी डॉ ज्योतीताई मेटे यांनी मेटे साहेबांचं क्षीरसागर मुक्त बीड करण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी अपक्ष उभा राहण्याच धाडस केल्यावर या क्षीरसागर बैठक झाली व आज दोन क्षीरसागर एक झाले जयदत्त क्षीरसागर यांनी योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा दिला उद्या मतदानाच्या दिवसा पर्यात तिन्ही क्षीरसागर एक होतील परंतु कितीही एक झाले तरी बीडच्या जनतेने क्षीरसागर मुक्त करण्याचा निर्धार केला आहे जनतेची क्षीरसागर मुक्त बीड करण्याची क्षमता फक्त डॉ ज्योतीताई विनायकराव पाटील यांच्यात आहे क्षीरसागर मुक्त बीड करण्यासाठी बॅटरी टॉर्च या चीन्हा मतदान करून क्षीरसागर मुक्त बीड करणारच असा निर्धार जनतेने केला आहे

पान १ वरून

### स्वाभिमानी,निष्ठावंत

प्रचारार्थ कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जेष्ठ नेते जीवनराव गोरे, खासदार बजरंग सोनवणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संवाद साधताना आ.संदीप क्षीरसागर म्हणाले, बीड मतदारसंघात माजी विरोधक मला एकत्र येऊन घेरण्याचा प्रयत्न करत आहेत परंतु त्यांचे हे प्रयत्न सफल होणार नाहीत, कारण बीड मतदार संघातील जनता आपल्या सर्वांसोबत आहे. आता आपल्या सर्व सहकाऱ्यांची एकजूट नक्कीच विजयाकडे घेऊन जाणारी आहे. त्यामुळे विरोधकांनी कितीही उठाठेव केली तरी त्यांना सुज्ञ स्वाभिमानी मतदार थारा देणार नाहीत. विरोधक माझ्यावर टिका करण्यात धन्यता मानत आहेत परंतु त्यांनी कितीही आरोप केले तरी मतदारसंघातील जनता तुम्हाला योग्य ती जागा दाखवतील अशा शब्दात आ.संदीप क्षीरसागर यांनी विरोधकांना खडेबोल सुनावले. तसेच आपला विजय निश्चित असून आता फक्त मताधिक्य वाढवण्यासाठी सर्व मित्र मंडळ व सहकाऱ्यांनी येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस अनुक्रमांक ३ समोरील बटन दाबून सर्वांनी प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.यावेळी त्यांनी गत पाच वर्षात आमदारकीच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला.आम्ही विकासासाठी काम करतो.विरोधकावरही टिका करताना संयम बाळगतो असेही ते म्हणाले.

मतदारांनीच संदीप भैय्यांची निवडणूक हाती घेतली-राजेंद्र मस्के

आ.संदीप क्षीरसागर हे कायम जनतेत राहून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी काम करत असतात. पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांना न्याय देण्यासाठी आहे. त्यामुळे मतदार संघातील मतदार आपल्या सोबत आहेत. सर्व घटकांना विकास कामे पूर्ण करत न्याय देण्याचे काम संदीप भैय्यांनी केले आहे.म्हणूनच बीड विधानसभा मतदार संघातील मतदारांनीच संदीप भैय्यांची निवडणूक हाती घेतली असल्याने त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला.

### त्याने प्रश्न विचारले, मुंदडांनी पोलीस बोलवले

### तरुण म्हणाला, हे चुकीचे, आम्ही तुम्हाला निवडून दिले, मुंदडांची बोबडी वळाली

## महायुतीचा उमेदवार अडचणीत




### मुंदडांच्या दाबदडपीविरोधात मतदार संघात उठला आवाज

केज (दिव्य न्युज):- गेली पाच वर्षे ज्या हिडीस पद्धतीने मतदारांना वागवले आणि आता पुन्हा गावागावात मतं मागायला निघाले, तेव्हा मतदारांनी थेट आमदार मुंदडांच्या सासरे बुवांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. मतदारांच्या तिखट प्रश्नावर उत्तर देण्याऐवजी आमदाराच्या सासर्याने थेट पोलीस बोलवल्यानंतर मतदारात असंतोष पसरला आणि मतदारांनी काकाजी हे चुकीचे आहे, आम्हाला त्रास देऊ नका, आम्हाला त्रास देणं चुकीचे आहे, असे म्हणत चांगलेच झापले. त्याचा व्हिडिओ व्हायरल झाला असून सदरची घटना ही मौजे मगरवाडी ता. अंबाजोगाई येथे घडली आहे.

सत्तङेची धूंदी डोक्यात शिरल्यानंतर तो व्यक्ती कसा वागतो, याचं ज्वलंत उदाहरण केजच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या कुटुंबियाकडे पाहिल्यानंतर दिसून येतं. गेल्या पाच वर्षाच्या कालखंडात मुंदडा कुटुंबियांकडून मतदारसंघातल्या सर्वसामान्य नागरिकांना अनेक वेळा त्रास दिल्याचे समोर आले आहे. आंदोलन असो, न्याय हक्काच्या मागणीसाठी घरासमोर केलेला ठिय्या असो अथव मराठा समाजाने व्यक्त केलेल्या भावना असो, त्या त्या ठिकाणी मुंदडा कुटुंबियाने वेळोवेळी मतदारसंघातल्या मतदाराचीं वेळोवेळी अवहेलना केली आहे. आता पुन्हा मुंदडा निवडणूक रिंगणात असल्याने मतं मागण्यासाठी आमदार मुंदडांचे पतीदेव आणि सासरेबुवा गावागावात फिरत आहेत. अशा वेळी या पाच वर्षामध्ये विकासाची साधी वी ही न मांडल्याने लोक जाहीर सवाल करू लागले आहेत. दोन दिवसांपूर्वी आमदार मुंदडांचे सासरे बुवा अंबाजोगाई तालुक्यातील मगरवाडीत प्रचारासाठी गेले होते. त्याठिकाणी तेथील तरुणांनी काही सवाल उपस्थित केले. त्यावेळी नंदकिशोर मुंदडा यांनी गावात तत्काळ पोलीस बोलवले. त्यामुळे तरुणांच्या संतापाचा भडका उडाला आणि ते म्हणाले, काकाजी हे चुकीचे आहे. काकाजी आम्ही तुम्हाला आधी निवडून दिले, आम्हाला त्रास देणे चुकीचे आहे. अचानक तरुणांचा मोठा घोळका गाडीसमोर गोळा झाला त्यावेळी मुंदडा यांनी 'मी पोलीसांना बोलवलं नाही, मी शपथ घेऊन सांगतो, माझे मोबाईल बघा, निवडणूक ही दोन दिवसाची आहे' अशी सारवासारव केली मात्र मुंदडाचंया वर्तवणुकीचा आणि निष्क्रीयतेचा फटका या वेळेस महायुतीच्या उमेदवाराला बसणार असल्याचे यावरून दिसून येते.